# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

आकुर्डी, पुणे-४४, दुरध्वनी क्र.०२०-२७१६६०००, फॅक्स : ०२०-२७३५३६७०


जा.क्र. विप्रा/भांडार/(प्र. क्र.102)/1215 दिनांक :- 30/09/2020

## निविदा सुचना क्र. भांडार - 1 सन 2020-21

**कामाचे नाव :- प्राधिकरण कार्यालयाच्या मालकीची जुन्या वाहनांची विक्री / लिलाव करण्याबाबत**

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे 44 यांच्या वतीने प्राधिकरण कार्यालयाच्या मालकीची खालील जुन्या वाहनांची जशी आहेत त्या स्थितीत विक्री ( लिलाव ) करावयाची आहे. त्याकरिता इच्छुक निविदाधारकाकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वाहन प्रकार/ मॉडेल | वाहन क्र. |
|---|---|---|
| 1 | फियाट सियाना कार | MH 14 X 009 |
| 2 | ट्रक्टर | MH 14 B 2183 |
| 3 | ट्रक्टर चा टँकर | MH 14 F 6486 |
| 4 | टॅक्टर चा टेलर | MH 14 K 9632 |
| 5 | ट्रक टँकर | MH 14F 6286 |
| 6 | मारुती ईस्टीम कार | MH 14 AR 2222 |
| 7 | मारुती ईस्टीम कार | MH 14 AE 8059 |
| 8 | मारुती ईस्टीम कार | MH 14 AE 8056 |

| | |
|---|---|
| वेबसाईटवरील निविदा प्रसिध्दी कालावधी | दि.02/10/2020 रोजी सकाळी 10.00 पासून ते दि.19/10/2020 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा पूर्व बैठक | दि.06/10/2020 वेळ दुपारी 12.00 वा. ठिकाण- मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - 44. |
| मोहोर बंद निविदा स्विकृती | दि.05/10/2020 रोजी सकाळी 10.00 ते दि. 19/10/ 2020 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 21/10/2020 वेळ सकाळी 11.30 वा. |

टिप : -

1. निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या निविदा फॉर्मसोबत आहेत. तसेच www.pcntda.org.in या वेब साईटवर उपलब्ध आहे.
2. निविदा संदर्भात अधिक माहितीसाठी जनसंपर्क विभाग, प्राधिकरण, आकुर्डी, पुणे येथे संपर्क साधावा. दुरध्वनी क्रमांक – 020-27166000

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकीय इमारत आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-44, दुरध्वनी क्र.020-27652934/35


## वाहनांच्या विक्री साठीच्या अटी व शर्ती

1) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाच्या मालकीची खालील जुनी वाहने विक्री करावयाची असून वाहनांचा प्रकार, क्रमांक, उत्पादन वर्ष, अपसेट प्राईज, इ. तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र | वाहनाचा प्रकार व वाहन क्र. | वाहन सद्या असलेले ठिकाण | कार्यालयाने निश्चित केलेली अपसेट प्राईज रु. |
|---|---|---|---|
| 1 | **फियाट सियाना कार**<br>**MH 14 X 009**<br>Chasis No. - 8008937<br>Engine No. - 0016282<br>Colour – White<br>Seating Capacity – 5<br>उत्पादन वर्ष - 2001 | जुनी प्राधिकरण ऑफीस इमारत,निगडी बस स्टॉप शेजारी सेक्टर नं. 24 सावली हॉटेल समोर,निगडी पुणे-44 | 15000/- |
| 2 | **ट्रक्टर (महिंद्रा)**<br>**MH 14 B 2183**<br>Chasis No. - ED15222<br>Engine No. - ED15222<br>Colour – Red<br>Seating Capacity – 1 + 1<br>उत्पादन वर्ष - 1996 | से.नं 24 प्राधिकरण रोप वाटिका लोकमान्य हॉस्पीटल पाठीमागे निगडी,पुणे-44 | 72000/- |
| 3 | **ट्रक्टर चा टँकर**<br>**MH 14 F 6486**<br>Chasis No. - 96-6TC-2058<br>उत्पादन वर्ष - 1997 | से.नं 24 प्राधिकरण रोप वाटिका लोकमान्य हॉस्पीटल पाठीमागे निगडी,पुणे-44 | 24000/- |
| 4 | **टॅक्टर चा टेलर**<br>**MH 14 K 9632**<br>Chasis No. - 96-6JC2052<br>उत्पादन वर्ष - 1997 | से.नं 24 प्राधिकरण रोप वाटिका लोकमान्य हॉस्पीटल पाठीमागे निगडी,पुणे-44 | 16200/- |
| 5 | **ट्रक टँकर**<br>**MH 14F 6286**<br>Chasis No. - 360044KTQ736434<br>Engine No. - 697D24KTQ818219<br>Seating Capacity – 1 + 1<br>उत्पादन वर्ष - 1996 | से.नं 24 प्राधिकरण रोप वाटिका लोकमान्य हॉस्पीटल पाठीमागे निगडी,पुणे-44 | 54000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | **मारुती ईस्टीम कार**<br>**MH 14 AR 2222**<br>Chasis No. - MA3EBE41500482204<br>Engine No. - G13BBN369116<br>Colour – White<br>Seating Capacity – 5<br>उत्पादन वर्ष - 2007 | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ आकुर्डी पुणे-44 | 35000/- |
| 7 | **मारुती ईस्टीम कार**<br>**MH 14 AE 8059**<br>Chasis No. - MA3EBE41500482190<br>Engine No. - G13BBN369258<br>Colour – White<br>Seating Capacity – 5<br>उत्पादन वर्ष - 2007 | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ आकुर्डी पुणे-44 | 35000/- |
| 8 | **मारुती ईस्टीम कार**<br>**MH 14 AE 8056**<br>Chasis No. - MA3EBE41500482246<br>Engine No. - G13BBN369462<br>Colour – White<br>Seating Capacity – 5<br>उत्पादन वर्ष - 2007 | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ आकुर्डी पुणे-44 | 35000/- |

2) उपरोक्त 8 जुनी वाहने जशी आहेत तशी विक्री करण्यासाठी बंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहे.

3) निविदा सादर करताना 1300 + 18% GST 234 = 1534/- इतक्या निविदा शुल्काचा राष्ट्रीयकृत बँकेकडील CEO PCNTDA यांच्या नावे असलेला डी.डी. स्वतंत्रपणे जोडावा.

4) निविदा सादर करताना रु. 6500/- इतक्या बयाणा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेकडील CEO PCNTDA च्या नावे असलेला डी डी निविदेसोबत जोडवा.

5) निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचा एकत्र डी.डी. काढू नये. सर्व निविदाधारकांचे निविदा शुल्क हे जमा करुन घेतले जाणार (विनापरतावा) आहे. तर अयशस्वी निविदाधारकांची बयाणा रक्कम परत केली जाणार असल्याने निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचे डी. डी. स्वतंत्र काढणे आवश्यक आहे.

6) वाहन विक्रीसाठी अर्जाचा नमुना परिशिष्ट अ व दराचा नमुना परिशिष्ट ब सोबत जोडला आहे . तो डाऊनलोड करुन घ्यावा. व खालील सुचनेप्रमाणे भरुन सादर करावा.

7) निविदेची स्वीकृती दोन लिफाफा पध्दतीने करण्यात येईल.

1) लिफाफा क्रमांक 1 : - तांत्रिक लिफाफा

1) अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अर्जाचा नमुना परिशिष्ट

2) निविदा फॉर्म फी - रु. 1300/- + 18% GST = 1534/- चा डी. डी.

3) बयाना रक्कम रु. 6500/- चा D. D.

4) निविदाधारकाच्या पॅन कार्डची झेरॉक्स

5) निविदाधारकाच्या आधारकार्डची झेरॉक्स

2) लिफाफा क्र. 2 :- दराची निविदा परिशिष्ट ब

8) लिफाफा क्र. 1 मध्ये मागविलेली कागदपत्रे व लिफाफा क्र . 2 मध्ये मागविलेली दरपत्रके दोन स्वतंत्र पाकिटात घालून पाकीटावर लिफाफा क्र. 1 / लिफाफा क्र. 2 असा उल्लेख करुन ही दोन पाकिटे एका मोठया पाकीटात घालून मोठया पाकीटावर वाहन खरेदी साठी निविदा असा व निविदाधारकाच्या नावाचा उल्लेख करुन दि.19/10/2020 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावीत. या वेळेनंतर निविदा स्वीकारली जाणार नाही.

9) लिफाफा क्र. 2 मधील दरपत्रकामध्ये निविदाधारकास खरेदी करावयाच्या एका अथवा अनेक वाहनांचा उल्लेख करुन त्यासाठी देऊ केलेली वाहन निहाय किंमत नमूद करावी.

10) प्रथम लिफाफा क्रमांक 1 उघडण्यात येईल. लिफाफा क्र. 1 मध्ये आवश्यक कागदपत्रे सादर केलेल्या व तपासणीअंती पात्र ठरलेल्या निविदाधारकाचाच लिफाफा क्र. 2 उघडण्यात येईल.

11) दराचा लिफाफा क्र. 2 मध्ये निविदाधारकाने नमूद केलेली प्रत्येक वाहनाची किंमत स्वतंत्रपणे विचारात घेतली जाईल. जो निविदाधारक वाहनासाठी जास्त किंमत देऊ करेल त्यास त्या वाहनाचे वाटप केले जाईल. सर्व वाहनांच्या एकत्रित रक्कमेचा विचार केला जाणार नाही.

12) सदर निविदा दि.21/10/2020 रोजी सकाळी 11.30 वाजता समितीसमोर उघडण्यात येतील.

13) निविदांच्या लिफाफ्यावर वाहनांची खरेदी - सियाना कार/ट्रक्टर/ट्रक्टरचा टँकर/ ट्रॅक्टरचा ट्रेलर/ट्रक टँकर/ मारुती ईस्टीम कार 2222 / 8059 / 8056 यापैकी खरेदी करावयाच्या वाहनाचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक राहील.

14) विहीत मुदतीत प्राप्त न झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. टपालीची दिरंगाई किंवा कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

15) वाहने दि. 05/10/2020 ते दि. 19/10/2020 या कालावधीत सुटीचा दिवस वगळून सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत पाहावयास मिळतील. वाहने पहाण्यासाठी कार्यालयाकडे संपर्क साधून पहाण्याची वेळ निश्चित करावी.

16) निविदाधारकाने निविदा शुल्क व बयाना रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी डी जोडले नसल्यास निविदा उघडली जाणार नाही. निविदा रद्द केली जाईल.

17) निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा . मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी , पुणे 44 यांनी राखून ठेवलेले आहेत.

18) वाहनासाठी जास्त किंमत देऊ केलेली निविदा स्वीकारण्यात येईल. जास्त रक्कमेच्या निविदाधारकास वाहनाची विक्री केल्या बाबतचे पत्र दिले जाईल.

19) वाहनाची पूर्ण रक्कम / कर वगैरे इ. भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वाहनाचा ताबा देण्यात येईल.

20) सदर वाहनांची आहे त्या स्थितीत विक्री करावयाची आहे यास्तव निविदा सादर करण्यापूर्वी वाहनाची तपासणी करुन घ्यावी. वाहनात असणारी दोषांची शक्यता , मोडतोड, नादुरुस्ती याबाबत नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

21) शासकीय कर याबाबत सुट मिळणेकामी या कार्यालयाकडून प्रमाणपत्र मिळणार नाही . शासनाचे सर्व असणारे कर (आर टी ओ टॅक्स / विमा पॉलीसी , जी एस टी इ . ) भरण्याची जबाबदारी निविदाधारकावर राहील. वाहनाचे हस्तांतरण करुन घेतल्यानंतरच वाहनाचा ताबा देण्यात येईल.

22) वाहनाची नोंदणी रद्द करणे , हस्तांतरण हे निविदाधारकास करुन घ्यावे लागेल. याकामी आवश्यक तो ना हरकत दाखला या कार्यालयाकडून मिळेल. हस्तांतर फी ही निविदाधारकानेच भरावयाची आहे.

23) प्राधिकरणाकडून यशस्वी खरेदीदारास आदेश मिळाल्यास सात दिवसाच्या आत खरेदी किंमत भरणे बंधनकारक राहील.

24) ताबा मिळालेपासून सदर वाहन 10 दिवसाच्या आत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी अन्यथा निविदाधारका कडून 100/- रु. (अक्षरी रुपये शंभर) प्रतीदिन भुभाडे वाहन नेईपर्यंत वसूल करण्यात येईल. उपरोक्त अटी संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

25) विहीत कालावधीत जर संबंधित वाहन यशस्वी खरेदीदाराने ताब्यात घेतले नाही तर खरेदीदाराचा अधिकार राहणार नाही. अशा खरेदीदाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

26) उर्वरीत अपात्र निविदाधारकांची निविदे सोबत भरलेली बयाना रक्कम निविदेची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. निविदा फी परत केली जाणार नाही.

27) वाहने नेण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील व त्यासाठी येणारा ख र्च त्यांनी स्वत : करावयाचा आहे.

28) ज्या नावाने निविदा भरलेली असेल त्याच नावाने वाहन हस्तांतरित केले जाईल.

29) वरील प्रमाणे निविदेतील अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. असे हमीपत्र निविदाधारकाने लिफाफा क्र. 1 तांत्रिक लिफाफ्यात जोडावे. नमुना सोबत जोडला आहे.

30) अधिक माहितीसाठी ई- मेल dyceoadmin@pcntda.org.in व दुरध्वनी क्र. 020-27166000 येथे संपर्क साधावा.

31) निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण
आकुर्डी, पुणे 44

# परिशिष्ट अ

**प्रति,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
निगडी,पुणे-44.

**विषय:**- वाहन विक्री करण्याबाबत.
**संदर्भ:**- दैनिक मधील जाहिरात दिनांक: / /

महोदय,

- मी वाहन प्रकार --------------------- वाहन क्रमांक ------------------------साठी निविदा भरत आहे.
- मी निविदा माहिती पत्रकातील अटी व नियम वाचले असून ते मला मान्य आहेत व त्या सर्व अटी व नियम माझयावर बंधनकारक राहतील हे मला मान्य आहे.
- मी माहिती पत्रकातील पात्रतेच्या अटीनुसार निविदा भरण्यास पात्र असुन माझ्या पात्रतेबाबत पुरावयाची कागदपत्रे सोबत जोडली आहे.
- ना परतावा फॉर्म फी रक्कम रु. 1300 + 18% GST = 1534/- सह व बयाना रक्कम रु. 6500/- चा डी डी सोबत जोडला आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी ----------------------

निविदा धारकाचे नाव:-------------------------------

पत्ता:---------------------------------------------

-----------------------------------------------

मोबाईल क्र.-----------------------------------------

Email ID ----------------------------------------

## परिशिष्ट ब

# दराची निविदा

| अ.क्र. | निविदाधारकास खरेदी करावयाच्या वाहनाचा प्रकार व वाहनाचा क्रमांक | निविदा धारकाने नमूद केलेली रक्कम (प्रत्येक वाहनाची किंमत स्वतंत्रपणे नमूद करावी एकत्रित रक्कम नमूद केल्यास निविदा रद्द केली जाईल) | |
|---|---|---|---|
| | | आकडयात | अक्षरी रक्कम रुपये |
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |

निविदाधारकाची स्वाक्षरी -----------------------------------

निविदाधारकाचे नाव ------------------------------------

पत्ता ----------------------------------------------------

---------------------------------------------------------

मोबाईल क्रमांक ----------------------------------------------

Email ID -----------------------------------------------